# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.02.2025** **वारःसोमवार**

---

1 ) नवी दिल्लीत आज पहाटे भूकंपाचे झटके

2 ) २०३०पर्यंत भारताकडून कापड निर्यात ९ लाख कोटींवर नेण्याच लक्ष्य असल्याच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच प्रतिपादन

3 ) हिंद महासागर क्षेत्रातील देशांमध्ये परस्पर सहमतीने संपर्क यंत्रणा अधिक पारदर्शी आणि सहकार्यपूर्ण करण्याची गरज -- परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर

आणि

4 ) आशियाई स्क्वॉश कनिष्ठ सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघांनी पटकावली कांस्यपदकं

**<u>भूकंप</u>**

`नवी दिल्लीत आज पहाटे पाच वाजून 36 मिनिटांनी भूकंपाचे झटके बसले. त्याची तीव्रता 4 रिखटर एवढी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्र बिंदु दिल्ली जवळ धऊला कुवा इथ जमिनीच्या खाली 5 किलोमीटर वर होता. यात अजून कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झाल्याच वृत्त नाही . याबाबत अधिक तपशीलाची अपेक्षा आहे.

दरम्यान, या भूकंपानंतर आणखी काही धक्के बसण्याची शक्यता लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीच्या नागरिकांना शांत राहून याबाबत देण्यात येणाऱ्या सूचनांच पालन करण्याच आणि सतर्क राहण्याच आवाहन केल असून प्रशासकीय यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेऊन असल्याच म्हंटल आहे

**<u>पंतप्रधान</u>**

भारत सध्या जगातला सर्वात मोठा कापड निर्यातदार देश असून या क्षेत्रातली निर्यात आतापर्यंत तीन लाख कोटीं रुपयांवर गेली आहे , २०३०पर्यंत हीच निर्यात ९ लाख कोटींवर घेऊन जाणं हे आपलं लक्ष्य आहे,अस प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं आयोजित भारत टेक्स २०२५ मध्ये ते काल बोलत होते.

देशाच्या विविध भागात तयार होणाऱ्या वैशिष्टपूर्ण वस्त्राच्या रूपानं देशाच्या सांस्कृतिक विविधतेचं दर्शन घडतं", असं सांगून पंतप्रधान म्हणाले की भारत टेक्स हा आता जागतिक पातळीवरचा महोत्सव झाला असून हे प्रदर्शन जगभरातल्या वस्त्र-उद्योजकांसाठी एक चांगलं व्यासपीठ बनलं आहे. वस्त्रोद्योगाच्या

संदर्भात फार्म, फायबर, फॅब्रिक, फॅशन आणि फॉरेन हे पाच “एफ” घटक देशासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत; यातून शेतकऱ्यांपासून ते व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांना प्रगतीच्या नव्या वाटा मिळत आहेत, देशातील वैविध्यपूर्ण वस्त्रसंस्कृती जगभरात पोहोचवण्याची हीच योग्य वेळ आहे, अस हि मोदी यांनी सांगितल.

दरम्यान , भारत टेक्स हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचं भव्य वस्त्रोद्योग प्रदर्शन असून यामध्ये कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत विविध उत्पादनं आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे. प्रदर्शनाबरोबरच विविध चर्चासत्र, नवोन्मेष उपक्रम  स्टार्ट अप दालन, प्रशिक्षण कार्यक्रम , तसंच डिझाइन स्पर्धाही घेण्यात येत आहेत. ५ हजार हून अधिक प्रदर्शक, १२० हून अधिक देशांतील ६००० आंतरराष्ट्रीय खरेदीदार आणि इतर विविध अभ्यागत या प्रदर्शनात सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

देशातील आदिवासी समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी गेल्या दहा वर्षात अनेक पावलं उचलण्यात आली असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आदि महोत्सव 2025 चं उद्घाटन काल राष्ट्रपतींच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. आदिवासी समुदायाचा विकास झाला तरच देश खऱ्या अर्थानं विकसित होईल असं सांगून, यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये आदिवासी विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. देशातील आदिवासींची संस्कृती, परंपरा प्रदर्शित करण्याच्या उद्देशानं या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. यात सहाशेपेक्षा अधिक आदिवासी कारागीर, शिल्पकार आणि कलाकार सहभागी झाले आहेत.

**<u>मदत</u>**

नवी दिल्लीत परवा रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्या 18 जणांच्या कुटुंबियांना  भारतीय रेल्वे प्रशासनाने काल प्रत्येकी 10 लाख रुपयांची मदत जाहीर केली तर गंभीर जखमी झालेल्या तींन नागरिकांना प्रत्येकी अडीच लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे
सामान्य 12  जखमीना प्रत्येकी एक लाख रुपये देण्यात आले आहेत आतापर्यंत या  मदतीच्या रूपात 95 लाखांपेक्षा जास्त रक्कम वितरित करण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे एकंदर 15 जखमींपैकी 11 जणांना उपचारानंतर  घरी सोडण्यात आल असून सध्या 4 जखमींवर अजूनही उपचार सुरू आहेत .
दरम्यान, या प्रकरणी चौकशी करण्यासाठी उत्तर रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक नरसिंह देव आणि मुख्य सुरक्षा आयुक्त पंकज गंगावार यांची समिती रेल्वेनं नेमली आहे. या समितीनं स्थानकावरचे सीसीटीव्ही फूटेज राखून ठेवायचे निर्देश दिले आहेत.

**<u>एस जयशंकर</u>**

हिंद महासागर ही  जगाची जीवनरेखा असून , या क्षेत्रातील  देशांमध्ये परस्पर सहमतीने संपर्क यंत्रणा अधिक पारदर्शी आणि सहकार्यपूर्ण असली पाहिजे, अस प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री एस एस जय  शंकर यांनी केल .  ओमान मधील मस्कत इथ आयोजित आठव्या हिंद महासागर संमेलनात ते काल उद्घाटन सत्रात बोलत होते. भारत मध्य पूर्व युरोप आर्थिक कॉरिडोर  आणि भारत म्यानमा थायलंड

त्रिपक्षीय राजमार्ग या दोन्ही योजनांना  सामूहिक संपर्क योजना मानण्यात याव अस मत त्यांनी यावेळी व्यक्त केल. भारत हिंद महासागरच्या दोन्ही किनाऱ्यावरील देशात तणाव  आणि संघर्षाच वातावरण असून या तटीय  क्षेत्रात निरीक्षण यंत्रणे  द्वारे सामुद्रिक सुरक्षा राखण्यात भारत  महत्वाची भूमिका निभावत असल्याच जयशंकर यांनी यावेळी सांगितल. दरम्यान , एस जयशंकर यांनी काल ओमान, ब्रूनेई,  इराण आणि भूतान यांच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेऊन चर्चा केली.

**<u>सुजल गांव</u>**

प्रयागराजमधील महाकुंभ मेळ्यामध्ये भाविकांसाठी उभारण्यात आलेलं आणि तब्बल ४० हजार चौरस फूट क्षेत्रात विस्तारलेलं स्वच्छ सुजल गाव संपूर्ण देशासाठी आदर्श ठरलं आहे. विविध सरकारी उपक्रम इथं कार्यान्वित करण्यात आल्यानं  हे गाव उत्तर प्रदेशच्या ग्रामीण भागातील परिवर्तनाचं समग्र दर्शन घडविणारं  ठरलं आहे. राज्य सरकारनं  केलेल्या ऐतिहासिक सुधारणांमुळे बदललेल्या गावांचं दर्शन घडविणाऱ्या राज्याच्या यशोगाथेची झलक या प्रदर्शनात पर्यटकांना पाहायला मिळते. बांदा, झाशी, चित्रकूट, ललितपूर आणि महोबा यासह बुंदेलखंडातील पाणीटंचाईच्या समस्येवर कशा प्रकारे तोडगा काढण्यात आला आहे, हे या नमुना गावानं  दाखवून दिलं आहे. भेटीदरम्यान पाहुण्यांना 'जल प्रसाद' किंवा पाण्याचा प्रसाद दिला जातो. गावात दररोज सायंकाळी विविध कार्यक्रम, प्रदर्शने आणि दररोज गंगा आरती होत आहे. गावातील माहिती हिंदी, इंग्रजी, बंगाली, तेलुगू आणि मराठी अशा पाच भाषांमध्ये उपलब्ध आहे. देशभरातील पर्यटकांना उत्तर प्रदेशात होत असलेलेबदल अवगत व्हावेत, हाच यामागचा हेतू आहे या महिन्याच्या २६ तारखेपर्यंत पर्यटकांसाठी खुलं  राहणार आहे.

**<u>महाकुंभ</u>**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथ महाकुंभ मेळयासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सोईसाठी आणि अतिरिक्त  गर्दीच नियंत्रण करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने काल 4 विशेष रेल्वेगाड्या सुरू केल्या  दुपारी 3 ते रात्री 9  दरम्यान या गाड्या  सोडण्यात येणार आहेत. आज पाच गाड्या सोडण्यात येणार आहेत .
दरम्यान, काल महाकुंभ मेळयात संध्याकाळी 6 वाजेपर्यंत 1 कोटी 36 लाखांपेक्षा जास्त भाविकांनी स्नान केल 13 जानेवारीपासून  कालपर्यंत  52 कोटी 83  लाख भाविकांनी स्नान केल्याची नोंद झाली आहे.

**<u>अपघात</u>**

माली  देशात पश्चिम प्रांतात अवैध रित्या चालवण्यात येणारी  सोन्याची खाण कोसळून झालेल्या अपघातात ४८ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहिती नुसार काल डाबिया कम्युन मधल्या बिलाली कोटो इथं हा अपघात झाला. एका चीनी कंपनीद्वारे ही खाण चालवण्यात येत होती. माली देशात अशाप्रकारे अवैध खाणीत झालेला हा वर्षातील दुसरा अपघात आहे.

**<u>परिषद</u>**

सीमा सुरक्षा दल आणि बॉर्डर गार्ड बांगलादेश अर्थात  बीजीबी यांच्यातील ५५ वी महासंचालकस्तरीय सीमा समन्वय परिषद बीएसएफतर्फे उद्यापासून नवी दिल्लीमध्ये  आयोजित करण्यात आली असून ती २० फेब्रुवारी पर्यन्त चालेल. या परिषदेत महासंचालक दलजीतसिंग चौधरी यांच्या नेतृत्वाखाली, बीएसएफचं शिष्टमंडळ, बीजीबीचे महासंचालक मेजर जनरल मोहम्मद अशरफ उज्जमान सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखालील बीजीबी शिष्टमंडळाची भेट घेणार आहे. सीमेशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी आणि दोन्ही सीमा सुरक्षा दलांमध्ये चांगल्या समन्वयासाठी या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. या परिषदेत बांगलादेशस्थित उपद्रवी लोकांकडून बीएसएफ जवान आणि भारतीय नागरिकांवर होणारे हल्ले रोखण आणि सीमेपलीकडील गुन्हे कसे रोखता येतील यासह  इतर मुद्द्यांवर चर्चा केली जाणार आहे.

**<u>मांडवीय</u>**

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडामंत्री डॉ.मनसुख मांडवीय यांनी काल दादरच्या वसंत स्मृती भाजपा  कार्यालयात 'युवा संवाद' कार्यक्रमात तरुणांना मार्गदर्शन केलं. आपल्या युवा शक्तीची क्षमता भारताला लवकरात लवकर विकसित राष्ट्र बनवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला..

**<u>स्क्वॉश</u>**

हाँगकाँग स्क्वॉश सेंटरमध्ये पार पडलेल्या आशियाई कनिष्ठ सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघांनी कांस्यपदकं मिळवली आहेत. भारतीय पुरुष संघाला उपांत्य फेरीत मलेशियाकडून पराभव पत्करावा लागला, तर अनहत सिंगच्या नेतृत्वाखालील महिला संघाला यजमान हाँगकाँगकडून पराभव पत्करावा लागला. उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या संघाला आशियाई कनिष्ठ सांघिक स्क्वॉश विश्वचषक अजिंक्यपद स्पर्धेमध्ये कांस्यपदक देण्यात येतं.  १९८३ मध्ये सर्वप्रथम  झालेल्या आशियाई कनिष्ठ सांघिक अजिंक्यपद स्पर्धेची ही २२ वी आवृत्ती होती. 2011 आणि 2017 मध्ये विजेते ठरलेल्या भारतीय पुरुष संघानं आता 2 सुवर्ण, 6 रौप्य, 11 कांस्य अशी एकूण 19 पदकं  जिंकली आहेत. दरम्यान  २००३ आणि २०१३ मध्ये विजेत्या भारतीय महिलांनी स्पर्धेच्या इतिहासात दोन सुवर्ण, दोन रौप्य, आठ कांस्य अशी एकंदर १२ पदकं जिंकली आहेत.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार